# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.११.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार **दिनांक २० नोव्हेंबर २००६** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ३.१० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला मा.प्र.आयुक्त म्हणून उपआयुक्त महसूल तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२१. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३१. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३२. स.स.श्री.अ.रशिद खान मामु

३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३६. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३७. स.स.श्री.खान निसार मो.खान
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३९. स.स.सौ.राऊत छाया विलास
४०. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४१. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४४. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४६. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४९. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५१. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५२. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५३. स.स.श्री.खुडे विजय किसन
५४. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५५. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५६. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५७. स.स.श्री.घडमोडे भगवान देविदासराव
५८. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
५९. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६०. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६१. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६२. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६४. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
६५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६७. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
६८. स.स.सौ.जैन अल्पा विकास
६९. स.स.श्री.बारवाल गजानन
७०. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल

०३. स.स.श्री.राजेश व्यास

०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री. प्रशांत देसरडा : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. विविध विकास कामे महानगरपालिकेच्या मार्फत करण्यात येत आहे. ३ तारखेच्या वृत्तपत्रात सिडकोने आरक्षणाचे जे प्लॉटस् आहेत, ते विक्री करण्यासाठी जाहीरात दिली. ते प्लॉट खाजगी संस्थांना देण्यासाठी टेंडर काढण्यात आले. जो करारनामा मा. मंत्री श्री. राजेश टोपे साहेब यांचे कडून केला त्या करारनाम्याची प्रत वाचली असतांना जे आरक्षणाचे प्लॉट आहे. ते महानगरपालिकेकडे किंवा महापालिकेच्या सहमतीनुसार त्या प्लॉटचे विकास करावे. ३ तारखेपासून जी सिडकोने प्लॉट संदर्भात जाहीरात दिली त्याबाबत महापालिकेने काय ॲक्शन घेतलेली आहे याचा खूलासा करण्यात यावा. उदया त्या जाहीरातीनूसार शेवटची तारीख आहे. ते रद्द करण्या बाबत कळवावे. जे प्लॉट आहे ते आरक्षणातील आहे. त्यावर पूर्णपणे महानगरपालिकेचा हक्क आहे त्यामूळे सिडकोने केलेली कार्यवाही ही चूकीची आहे.

मा. महापौर : सिडकोने जी जागा विकसीत केली त्यावेळी काही रिझर्वेशन ठेवलेले होते. त्यात दवाखाना, शाळा , वाचनालय, व्यायाम शाळेचे रिझर्वेशन असतील.आणि त्या जाहीराती काढलेल्या आहे. ज्या दिवशी जाहीरात आली त्याच दिवशी एका स. सदस्यांनी माझ्याकडे पत्र दिले व त्याबरोबर महापौर या नात्याने मी पत्र देवून सिडको प्रशासनास तसे सुचित केलेकी जरी जाहीरात काढलेली असेल तरी त्या जागा विक्री करू नये. शासनाच्या नियमाप्रमाणे आम्ही कार्यवाही करीत आहोत. व शासनाकडे पत्र पाठवित आहोत असे कळविले आहे.महापालिका प्रशासनाचे या विषयी काय भुमिका आहे सहा. संचालक नगररचना यांनी खूलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा : उद्या निविदेची अंतिम तारीख आहे.

सहा. संचालक(न.र.) : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले त्यावेळी ज्या मालमत्ता महानगरपालिकेने हस्तांतर केल्या त्याची याची मालमत्ता अधिकारी तसेच शहर अभियंता यांचे कडे आहे. या बाबतचे कोणतेही दस्तऐवज या विभागाकडे नाही. त्यामूळे संबधीत विभागाकडून माहिती घेणे योग्य होईल.

श्री.महेश माळवतकर : सामाजिक सेवासाठी जे रिझर्वेशन ठेवले होते. ते प्लॉट विक्रीसाठी जाहीरात काढली त्याबध्दल महानगरपालिकेने सिडको विभागाशी पत्र व्यवहार केलेला आहे काय ?

मा. महापौर : जे सामाजिक सेवासाठी रिझर्वेशनचे प्लॉट होते ते सिडको विक्री करू शकते की नाही. हा मुद्या महत्वाचा आहे. खाजगी व्यक्तीला विक्री करून त्यांनी त्या सुविधा उपलब्ध करायच्या असे काही आहे काय ?

श्री.महेश मांळवतकर : उद्या शेवटचा दिवस आहे. विक्री केल्यानंतर ॲक्शन घेणार आहेत का प्रशासनाकडून खुलासा घेण्यात यावा.

मा. महापौर : जाहीरात काढल्याबरोबर त्यावर ॲक्शन घेतलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : सिडकोचे हस्तांतरण झाले याचा अर्थ असा होतो की सिडकोच्या ज्याही मालमत्ता असतील त्या महानगरपालिकेकडे आलेल्या आहेत असे असतांना पून्हा सिडको प्रशासन प्लॉट विक्रीसाठी जाहीरात का काढते.या संबधी महापालिका प्रशासनाने काही पत्रव्यवहार केलेला आहे का

मा. महापौर : खूलासा असा पाहिजे की ज्यावेळी सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले तेंव्हा त्या भूखंडावर मालकी कुणाची होती.

श्री.रविकांत गवळी : करारनामा काय झालेला आहे हे कुणालाही माहिती नाही. असेल तर सभागृहात खूलासा करावा.

मा. महापौर : विविध जे सुविधा देण्यासाठीचे भूखंड आहे ते भुखंड महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर जो काही करारनामा झालेला आहे त्याची प्रत सभागृहात मागविण्यात आलेली आहे. त्यासाठी वेळ लागेल.

श्री. गवळी रविकांत : ज्या जागा महानगरपालिकेला देणार होते त्याची अमबजावणी झालेली आहे की नाही.

मा. महापौर : प्रशासनाकडे माहिती बरोबर नाही प्रत मागविलेली आहे. या शहराचा महापौर म्हणून या संबधी मी अगोदरच एक पत्र सिडको प्रशासनाकडे दिलेले आहे.

श्री. रविकांत गवळी : करारनाम्यावर सही झालेली आहे का हे कुणालाही माहिती नाही. तिन्ही विभागाकडे माहिती नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : १ एप्रिल पासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. असे सर्व नागरीकांना आम्ही सांगितले आहे.३ तारखेच्या वृत्तपत्रात प्लॉट विक्री संदर्भात सिडकाने जाहीरात दिली आहे. हे भूखंड हे सामाजिक सेवेसाठी आहे. हस्तांतरण केल्यानंतर सदर भूखंड महापालिकेने ताब्यात घेतलेले होते काय याचा खूलासा करावा.

श्री. महेश मांळवतकर :जेथे सामाजिक सुविधा दयायच्या अशा प्लॉट विक्रीची जाहिरात आली हे प्रशासनास माहित नाही का ?

श्री. रेणुकादास वैद्य : महापालिका प्रशासनाने वेळीच कार्यवाही का केलेली नाही. सिडको प्रशासन जाहीरात कशी काढते.

श्री.कवरसिंग बैनाडे : सिडको हस्तांतरणा बाबत जो करारनामा झालेला आहे त्याची प्रत प्रत्येक संदस्यांना देण्यात यावी. सिडको हस्तांतरणाच्या निमित्ताने १५ कोटी रूपये मिळणार होते ते मिळालेले आहे का मिळाले असतील तर आतापर्यत सिडको भागात कोणती कामे केलेली आहे. ही रक्क्म सिडको भागासाठीच खर्च करावी असे हस्तांतराच्या वेळी ठरले होते त्यानूसार कार्यवाही केलेली आहे का याचा खूलासा करावा.

प्र.मुख्यलेखाधिकारी : सिडको हस्तांतरणाच्या निमित्ताने १५ कोटी रूपये महापालिकेला प्राप्त झालेले आहे.

श्री.संजय सिरसाट : या संदर्भात मी दिनांक १७.११.०६ रोजी मा. आयुक्त, उपआयुक्त , शहर अभियंता तसेच सिडको प्रशासनास पत्र दिलेले आहे. आतापर्यत कोणतीही कार्यवाही महापालिका प्रशासनाने केलेली नाही. होत असलेली कार्यवाही थांबवावयास पाहिजे होती.

सौ. रजनी जोशी :१ एप्रिल पासून सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले. तत्पूर्वी सिडकोच्या सर्व नगरसेवका समवेत प्रशासनाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरमध्ये एक बैठक घेण्यात आली. या बैठकीला सर्व पदाधिकारी अधिकारी उपस्थित होते. सर्वे करण्यात आलेला होता व आरक्षीत जे भूखंड आहे ते सर्व मनपाकडे येणार आहे असे सांगण्यात आले होते. प्रत्येक वार्डात एक ते दोन आरक्षीत भूखंड आहे. माझ्या वार्डात हेल्थ सेंन्टर व एक उद्यानसाठी आरक्षण आहे असे सिडकोचे मालमत्ता अधिकारी यांनी म्हटले होते. आरक्षीत भूखंड संस्थेला द्यावे. जी बातमी आलेली आहे त्यात असे दिले की जे आरक्षीत भूखंड आहे ते विक्रीस काढले ते विक्री करू नये महानगरपालिकेकडेच रहावे. असे लेखी सिडको कडून लिहून घेण्यात यावे.

श्री.अ.रशिद खान : पुंडलिकनगर भाग जर सिडको भागात येत असेल तर तेथे पिण्याचे पाणी देण्याबाबत भूमिपूजन केले.तेथे पाणी केंव्हा देणार आहेत.

मा. महापौर : सिडको भुंखड संदर्भात विषय चालू आहे. पाण्याचा विषय नंतर घेता येईल.

श्री.गजानन बारवाल : सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले. सर्व जागा महानगरपालिकेकडे आलेल्या आहेत असे आजपर्यंत समजलो आहोत. ज्या ज्या ठिकाणच्या जागा आरक्षीत आहेत त्या त्या ठिकाणी महानगरपालिकेनेबोर्ड लावलेले आहेत का या जागे संदर्भात महापालिका प्रशासन व सिडको यांचेमध्ये एखादी बैठक झालेली होती का त्या बैठकीत भुखंड विक्रीच्या संदर्भात काही चर्चा होवून ही पूढील कार्यवाही झालेली आहे काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.भगवान घडमोडे : सामाजिक सुविधा बाबतचे जे ही भूखंड आहेत ते महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे सर्व नगरसेवकांचा असा समज झालेला आहे की हे सर्व भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात असावयास पाहिजे. कारण जनतेला सुविधा दयाव्या लागणार आहे. सामाजिक सुविधेचे भुखंड सिउकोने विक्री केले तर त्या भागातील नागरीक नगरसेवकांनाच जाब विचारणार आहे. सामाजिक सुविधेचे भूखंड विक्री बाबत जी नोटीस काढलेली आहे ती रद्द करावी व ते भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घ्यावेत. तसे पत्र देवून सिडकोला कळवावे व होत असेलेली विक्री थांबवावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यावर चर्चा न करता जो करारनामा झालेला आहे तो तपासून घ्यावा त्याची सर्वांना माहिती दयावी. तसेच सिडकोकडून महानगरपालिकेला १५ कोटी सिडको भागात विकास कामासाठी मिळालेले आहे त्या बाबत कार्यवाही केलेली नाही. तसेच आपण नवीनच महापौर झालात या सभागृहाचे चित्र बदलावे. ज्यांना परवानगी दिली त्यांनाच बोलण्याची संधी दयावी.

श्री.संतोष खेंडके : या संदर्भात महानगरपालिकेचे अधिकारी तसेच सिडकोचे अधिकारी यांची आपण संयुक्त बैठक घेवून हे भूंखड महानगरपालिकेकडे विकसीत करण्यासाठी घेण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :सिडकोच्या राखीव भूखंडा विषयी चर्चा चालू आहे. सिडको हस्तांतरणा बाबतचा जो करार झालेला आहे तो मार्च महिण्यात केलेला आहे. सामाजिक सुविधेबाबतचे जे भुखंड सिडकोने काढलेले आहे तो त्यांचा अधिकार आहे. हे सर्व प्रथम नमुद करतो. जो करार झाला आहे त्यात फक्त खेळाचे मैदान . ओपनस्पेस कम्युनिटी सेंन्टर ग्रीन बेल्ट हे विना मोबदला सिडकोने महानगरपालिकेकडे दयायचे आहे. मालमत्ता विभाग ज्या विभाग प्रमुखाच्या अंतर्गत येतो त्यांनी खेळाचे मैदान किती व कूठे आहे आहे ओपनस्पेस किती आहे. याचा संपूर्ण आढावा घेतलेला असून मोजमाप झालेले आहे. जर खरोखरच महानगरपालिकेला विकास करावयाचा असेल व स्वत: च्या खर्चाचे विकास करावयाचा असेल तर त्या जागा घेण्यासाठी महानगरपालिकेने सिडकोला एक पत्र दयावे व हया जागा महानगरपालिका स्वत: खर्च करून विकासीत करणार आहे अद्यावत मोठे असे हॉस्पीटल आपण बांधणार असाल तर ते आरक्षीत भूखंड राखीव त्या किमतीत विकसीत करण्यासाठी घेण्यास तयार आहोत. कोणत्याही संस्थेस त्या जागा देवू नये अशी मागणी कायदेशीर आहे. असा ठराव करून मा. आयुक्त यांचे सहीने पत्र देवून सिडकोला तसे कळवावे.

श्री.रविकांत गवळी : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर ज्या ओपनस्पेस हस्तांतर झालेल्या आहेत त्यावर अतिक्रमण झालेले आहे काय?त्या जागेचे पजेशन

आपल्याला घेतलेले आहे काय याचा खूलासा करावा.मा.महापौर मा. उपमहापौर यांची नव्याने निवड झालेली आहे.याचे अभिनंदन करतो. पूढील कार्यकाळ हा शहराच्या विकासाच्या दृष्टीने चांगला जावा अशी अपेक्षा करतो.

मा. महापौर : सिडकोने ज्या भुखंडा बाबत जाहीरात काढलेली आहे ती योग्य की, अयोग्य आहे याचा प्रशासनाने खूलासा करावा. जो करार झालेला आहे त्या कराराच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.

उप आयुक्त (म.) : सिडको व महानगरपालिकेचा जो करार झालेला आहे त्यातील अट क्र ४नूसार सिडको अधिसूचित क्षेत्रातील सर्व रस्ते , खेळाचे मैदान , मोकळया जागा, बगीचे , झाडे जमिनी ई. सर्व याची स्वतंत्र यादी आहे. ज्यामध्ये ३९१ खूल्या जागा आहे, ३९ खेळाचे मैदान आहेत.५६उद्यान आहे हे सर्व महापालिकेला विना मोबदला हस्तातंरण झालेले आहे.सिडको प्रशासनाने जी भूखंड विक्रीची जाहिरात काढलेली आहे ती यादी या व्यतिरिक्त आहे. सिडकोने महानगरपालिकेला एक पत्र दिले आहे की जर हया जागा महानगरपालिकेला घ्यायच्या असतील तर महानगरपालिकेने रितसर सिडकोकडे अर्ज करावा. सिडकोच्या ज्या जागा आहेत त्या सर्व जागेवर बोर्ड लावण्याची कार्यवाही प्रशासनाने सूरू केलेली आहे. जो करारनामा झालेला आहे त्या करारनाम्याची एक प्रत सर्व सदस्यांना सभा संपण्यापूर्वी देण्यात येईल.

मा. महापौर : आताच प्रशासनाने खूलासा केलेला आहे. जे सामाजिक सुविधेसाठीचे भूखंड होते ते करारनाम्याच्या यादीत नाहीत. जर ते भूखंड घ्यायचे असतील असे सभागृहाला वाटत असेल तर तसा सभागृहाने निर्णय घ्यावा. निर्णय घेवू.

श्री.भगवान घडमोडे : सामाजिक सुविधाचे भूखंड महानगरपालिकेने घ्यावेत जेणे करून नागरीकाना सूविधा देता येतील. म्हणून तसा एक ठराव करून तसे सिडकोला कळविले पाहिजे. आपण सेवा देवू शकरणार नाही. व शासनाकडे प्रशासनाने पत्रव्यवहार केला पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : स. सदस्य श्री.भगवान घडमोडे यांनी जे प्रस्तावित केले आहे त्यास माझे अनुमोदन आहे. सदरील भूखंड महानगरपालिकेने घेवून विकसीत करणे आवश्यक आहे.

श्री.भाऊसाहेब ताठे : सर्व भूखंड मोफत घ्यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : या सभागृहात सभागृह नेता यांना तसा ठराव ठेवण्यास सागावे स. सदस्यांचे अनुमोदन घ्यावे ऐनवेळी ठराव मंजूर करावा.

श्री.संजय सिरसाट : सिडकोच्या भूखंडविक्री संदर्भात जाहिरात आली व कुणीतरी नागरीक मा. महापौरांना भेटले तर आणि मा. महापौरांनी त्यांना पत्र दिले असे त्यांचे भाषणात सांगितले ते भूखंड विकता येतात की नाही याची शहानिशा केलेली नाही. सिडकोला आपण एक पत्र दिले आहे की हे भूखंड विकू नये ते आम्हाला पाहिजे. तुम्ही शासनाकडे पाठवा व भुखंड विक्री थांबवा हे सर्व होत असतांना सिडकोचा जो करारनामा झालेला आहे त्याचा थोडक्यात खूलासा करण्यात आलेला आहे. एकूण भूखंड किती आहे याची यादी करून प्रशासनाचे पत्र आतापर्यत तेथे जायला पाहिजे होते. एकूण रक्कम किती होते व कोणकोणते भूखंड घ्यावयास पाहिजे. जे कामाचे असतील तेच भूखंड घ्यावे नसता भुखंड घ्यायचे व लोकांनी तेथे अतिक्रमण करायचे प्रशासनाने भूखंडाची यादी दयावी सभागृह त्यास मान्यता देईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : आपला गैरसमज झालेला आहे. जे निवासी भूखंड आहे. ऑलरेडी विकलेले होते. परंतू पुर्तता न केल्यामूळे पुन्हा जाहिरात दिलेली आहे. त्यातील मी एक घेतलेला होता तो परत केला जाहिरातीमध्ये तो आलेला आहे. करारनाम्यानूसार जे भुखंड आहे व ते जाहिरातीमध्ये आले असतील तर त्यावर महानगरपालिकेचा अधिकार आहे. नंतर असे ठरले होते की जे विकण्यासाठी भूखंड आहे ते विकण्यास परवानगी दिलेली होती ते तपासून पहावे त्यानंतर ठराव करून पाठवण्यात यावा.

मा.महापौर :ज्या वेळेस सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. जो करारनामा झाला आहे त्यात हे भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात येणार नाही स्पष्ट असे दिले .त्या कराराची प्रत सर्व सदस्यांना देण्यात येत आहे.जर महानगरपालिकेला हे भूखंड पाहिजे असेल तर तसा निर्णय या सभागृहाला घ्यावा लागेल. व तसा ठराव करून सिडकोला कळविण्यात येईल.

श्री. भगवान घडमोडे : निवासी भूखंडाबद्दल बोलत नाही. सामाजिक सुविधाचे भूखंड महानगरपालिकेने घ्यावे तरच जनतेला सुविधा देता येईल. तसा या सभागृहाने ठराव घेवून सिडकोला कळवावे. व जी विक्री होत आहे ती होवू देवू नये.

श्री. रेणुकादास वैद्य : सिडको हस्तांतर ज्या अटी शर्तीनूसार झाले त्या सर्व मालमत्ता महानगरपालिकेने ताब्यात घ्याव्यात. सामाजिक सुविधाचे भूखंड महापालिकेने घ्यावे व तसे शासनास कळविण्यात यावे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे भूखंड महानगरपालिकेला सिडकोने दिले आहे त्याचाच अगोदर विकास करावा. ज्या कारणास्तव भूखंड ठेवलेले आहे.

मा.उपमहापौर : सदर भूखंड सिडकोने महानगरपालिकेला मानमात्र दराने दयावे. असा प्रस्ताव या सभागृहाने घ्यावा. कारण ते नागरीकाच्या हितासाठीचे आहेत.

मा.महापौर : या विषयावर सभागृहात बरीच चर्चा झालेली आहे. तसा लेखी ठराव आपण घेत आहोत. सामाजिक सुविधाचे भूखंड लागणार आहे. म्हणून सभागृहाच्या भावना लक्षात घेता महानगरपालिकेला या भूखंडाची गरज आहे. हे भुखंड सिडकोने महानगरपालिकेला मानमात्र दराने दयावे असा ठराव पास करून सिडकोला व शासनाला कळविले जाईल. असा ठराव पारीत करण्यात येत आहे. आणि महानगरपालिकेच्या वतीने या सभेचा महापौर म्हणून परत या भूखंडाचे आरक्षणात बदल करता येणार नाही ज्या सुविधेसाठी आहे त्याच सुविधेसाठी वापर करण्यात येईल. यावर बंधन राहील हे सुध्दा नमुद करतो.सध्याच्या दरात जवळपास १.४३ कोटी रूपये लागतील परंतू हे भूखंड सिडकोने नाममात्र दराने कमीत कमी दराने दयावे. किती रक्क्म लागेल याची माहिती घेवून सभागृहाला कळविण्यात येईल.

श्री.महेश माळवतकर : नगरसेवकांना निवडूण येवून २० महिने झाले . मागिल एक वर्ष सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले नव्हते म्हणून विकास कामे होवू शकली नाही. परंतू सिडको हस्तांतरण होवून आठ महिने झाले. सिडको विकासासाठी १५ कोटीचा निधी शासनाने दिला एप्रिल महिण्यात आम्ही कामे सुचविली. परंतू आठ महिण्यात कोणत्याही सिडको हडकोच्या भागात विकास कामे झालेली नाही झाली असतील तर त्या संदस्यानी सभागृहात तसे सांगावे. नोंव्हेबर महिणा सुरू झाला. जर वार्डात एकही विकास काम होत नसेल तर जनतेला आम्ही काय जवाब दयायचा.

मा.महापौर : सिडको भागातील ओपनस्पेसवर अतिक्रमण झालेले आहे का तेथे संरक्षित भिंती केलेल्या आहेत का याचा खूलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी :सिडकोतील नवीन खुल्या जागेच्या अतिक्रमणा संदर्भाने माझ्याकडे स. सदस्य श्री. गवळी यांनी तक्रार दिलेली आहे. एक दोन तक्रारी आणखी प्राप्त झालेल्या आहेत. सिडकोच्या खुल्या जागेच्या संदर्भाने मालमत्ता विभागाने अदयापपर्यंत रितसर ताबा महानगरपालिकेने घेतला नाही.

श्री. महेश माळवतकर : अधिकारी सांगतात खुल्या जागेचा रितसर ताबा घेतलेला नाही. एक अधिकारी सांगतात की सामाजिक सुविधाच्या जागेचा करारामध्ये समावेश नाही. असे उत्तर दिले तर सिडको प्रशासन या जागेची पण जाहिरात काढेल. जागेवर कोणी पाहणी केली का.

श्री. प्रशांत देसरडा : अद्यापपर्यंत खुल्या जागा महानगरपालिकेकडे आलेल्या नाही. प्रशासनाला विचारू इच्छितो की सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तातरण झालेले आहे का याचा ही खूलासा घेण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : एक जबाबदार अधिकारी यांनी बे जबाबदारपणे उत्तर दिले आहे. नगरसेवक सभागृहात जनतेच्या व वार्डातील विकास कामासाठी येवून बसतात. अधिकारी पगार घेवून जर चुकीचे उत्तर देत असतील व सभागृहाची दिशाभूल करीत असतील तर ही पध्दत योग्य नाही. जर माहिती नसेल तर जे सक्षम अधिकारी किंवा विभाग प्रमुख आहे त्यांनी उत्तर दिले पाहिजे. व त्या अधिकाऱ्याना समज दयावी की चुकीची उत्तरे देवू नये . चुकीचे उत्तर देणारया अधिकाऱ्याना शिक्षा केली पाहिजे. त्याचे जे विभाग प्रमुख आहे त्यांनी खूलासा करावा.

मा.महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी चुकीचे व बेजबाबदारपणे उत्तर दिलेले आहे. सिडको हस्तातरण झाल्यानंतर जर महानगरपालिकेने ३९१ जागा ताब्यात घेतलेल्या आहेत हे अधिकाऱ्याना माहित नाही हे चुकीचे उत्तर आहे. माझी ही पहिलीच सभा आहे. अधिकाऱ्याना माहिती नसेल तर वेळ मागवून घ्यावा ` परंतू चूकीची उत्तरे देवू नये. म्हणून सर्व अधिकाऱ्याना तशी ताकीद देण्यात येत आहे.

श्री.रविकांत गवळी :माझ्या माहिती प्रमाणे प्रशासकीय अधिकारी यांनी जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे.कारण मालमत्ता विभागाकडून त्यांना माहितीच नाही की ओपनस्पेस महानगरपालिकेकडे आलेल्या आहेत.

मा.महापौर : प्रशासकीय अधिकाऱ्याचे विभागप्रमुख उपआयुक्त (महसूल) हे आहेत. ते माहिती देतील.

उपआयुक्त(म) : महानगरपालिका व सिडको मध्ये जो करार झालेला आहे त्यातील अट क्र ४ वाचून दाखविण्यात येत आहे. सिडको अधिसुचित क्षेत्रातील सर्व रस्ते खेळाची मैदाने , मोकळया जागा, बगीचे , झाडे, जमिनी, जलनिस्सारण वाहिन्या, विद्युत वाहिन्या, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृह जसे आहे तसे या तत्वावर सिडको महानगरपालिकेस हस्तांतरण करीत आहे. या संबधीचा तपशील स्वतंत्र परीशिष्टामध्ये जोडण्यात येत आहे. ज्यामध्ये ३९१ खुल्या जागा व ३९ खेळाचे मैदान ५६ बगीचे आहे. या सर्व मालमत्तेचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. या मालमत्ता महानगरपालिकेने ताबयात घेतलेल्या आहे. प्रत्येक जागेमध्ये मंदीरे किंवा इतर अडचणी आहे. त्या संदर्भात महानगरपालिका सिडकोकडून सविस्तर आढावा घेवून सिडकोकडून तेवढया जागेची हद्यीपूरती वेगळी कार्यवाही करणार आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ : उपआयुक्त महसूल यांनी वेगळे मत व्यक्त केलेले आहे. ओपनस्पेस असेल किंवा मंदीर व इतर जागा असतील त्या हस्तातरीत करून घेण्याचा निर्णय झालेला आहे. ते सोडून पून्हा वेगळी कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

श्री.महेश मोळवतकर :सिडको भागासाठी १५ कोटीचा निधी आहे. त्या ठिकाणी विकास कामे झालेली नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : थोडासा चूकीचा खूलासा झालेला आहे, मंदिरे असली तरी निर्णय झालेला आहे. वेगळीकडे जाण्याचा प्रश्न नाही.

मा. महापौर : संबधीत तीनही कार्यकारी अभियंता यांनी त्याचे विभत्तगा संबधी माहिती दयावी.

कार्य.अभियंता (विद्यु). :सिडको भागामध्ये ठळक कामाचे अंदाजपत्रक तयार करून जे की, स्विमींग पूलचे २.१५ कोटीचे काम होते. त्याचे नुकतेच टेंडर काढलेले आहे.त्याच प्रमाणे बोटॅनिकल गार्डनचे काम आहे. ते ही २ कोटीचे आहे. तेही टेंडर प्रोसेसमध्ये आहे. तसेच जे लहान स्वरूपाची कामे आहे त्या संदर्भाचा तपशील मागविलेला आहे. १० मिनिटात माहिती देण्यांत येईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :बजेट मंजूर होवून खूप कालावधी गेलेला आहे. कामे तातडीने होण्यासाठी सिस्टीम ठरवा जो वेळ लागतो तो लागू नये. लवकरात लवकर कशी कामे होतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे.या बाबतीत सुधारणा व्हावी व सिडको भागात लवकरात लवकर कामे कशी होतील याकडे लक्ष दयावे.

कार्य.अभियंता(पापू) : सिडको भागात विकास कामे चालू आहे. एकूण ५० कामे आहे. त्यापैकी २१ कामे पूर्ण झालेली आहेत.बाकी प्रोसेसमध्ये आहे.

अति.शहर अभियंता : सन २००६-०७ मधील सिडको भागातील डांबरीकरणाची कॉंक्रीट पाथवेची ही सर्व कामे टेंडर प्रोसेस होवून ॲग्रीमेंन्ट स्टेजवर असून डिसेंबरपर्यत कामे सुरू होतील.

मा. महापौर : आताच सर्व कार्यकारी अभियंता यांनी खूलासा केलेला आहे सिडको भागात लवकरच विकास कामे होणार आहे काही ठिकाणी कामे केलेली आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :वार्ड क्र.९० मध्ये सि.टीएस नं. १६९११ सर्वे नं. ६ येथे १९८३ मध्ये माधवराव घोरपडे यानी २,८० लक्षचा जागेचा मोबदला म्हणून धनादेश घेतलेला आहे. परंतू ती महापालिकेची जागा असतांना तेथे संरक्षित भिंत असतांना या जागेवर माधवराव घोरपडे यांनी संरक्षित भिंत तोडून बांधकाम केलेले आहे. या संदर्भात वेळोवेळी मी प्रशासकीय अधिकारी यांना सदर अतिक्रमण थांबवावे म्हणून विनंती केली परंतू कार्यवाही होत नाही. प्रशासकीय विभागाचे पथक तेथे जाते. सदरील व्यक्ती हे रविवारचा दिवस असल्यामूळे पून्हा तेथे काम सुरू केलेले आहे. युनायटेड वेस्टर्न बँक औरंगपूरा येथून यांनी २.८० लक्षचा धनादेश घेतल्याची माहिती मिळविण्यासाठी मालमत्ता विभागाकडे विचारणा केलेली आहे.उपआयुक्त महसूल यांचेकउून मी माहिती घेतली असता संबधीत घोरपडे यांना चुकीच्या पध्दतीने बांधकाम परवानगी दिलेली आहे अशी माहिती मिळालेली आहे. १९९९ मध्ये जो ठराव झालेला आहे त्यात माधवराव तुळशीराम घोरपडेचे नाव नाही. असे असतांना ती जागा माधवराव घोरपडे यांना कशाच्या अधारे दिली याचाही खूलासा व्हावा. जी कागदपत्राची ढवळाढवळ झालेली आहे ते सर्व कागदपत्र देण्यात यावे. व १९८३मध्ये जो मोबदला त्यांना दिलेला आहे त्या मोबदला दिलेल्याची प्रत मला देण्यात बाबत विनंती केलेली आहे परंतू प्रशासकीय अधिकारी त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. असा माझा आरोप आहे.

श्री.अ.साजेद.अ.सत्तार :स. सदस्य श्री. दाभाडे हे गेल्या तीन बैठकीपासून हा विषय मांडतात. यावर योग्यतो निर्णय आजच्या सभेत देण्यात यावा.या बाबतीत नेमकी काय सत्यता आहे ते प्रशासनाने जाहीर करावे.

उपआयुक्त (महसूल) : सीटी सर्वे.नं. १६९११ मधये माधव तुळशीराम घोरपडे यांना जी बांधकाम परवानगी ही नगररचना विभागाकडून देण्यात आलेली आहे.स.सदस्य श्री. दाभाडे यांची या संबधी तक्रार आल्यानंतर नगररचना विभागात बांधकाम परवानगी रद्य करण्या संबधी स्वतंत्र निवेदन दिलेले आहे. त्यानंतर १७ नोंव्हेबर रोजी माधवराव घोरपडे यांनी जे बांधकाम केले आहे. त्याबध्दल नोटीस दिलेली आहे. त्याच दिवशी विधी सल्लागार यांनी मला दुरध्वनीवरून असे सांगितले की या प्रकरणी न्यायालयाने जैसे थे आदेश असून या संबधी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पूढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जो स्थायी समितीने ठराव केला त्यात माधव घोरपडे यांचे नाव नाही. असे असतांनाही संबधीत व्यक्तीला बांधकाम परवानगी दिलेली आहे. संबधीताने बोगस पीआरकार्ड तयार केले. पीआरकार्ड कसे तयार झाले. बांधकाम परवानगी कशी देवू शकता बांधकाम परवानगी व बांधकाम करण्यास अधिकारी त्यांना पूर्णपणे मदत करीत आहे. महानगरपालिकेची संरक्षित भिंत तोडून श्री.घोरपडे यांनी बांधकाम केलेले आहे. मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश केंव्हा आलेले आहे हे प्रकरण केंव्हा पासून चालू आहे परवानगी केंव्हा दिली कशाच्या अधारे परवानगी दिली परवानगी देतांना तेथील संरक्षित भिंतीचा खर्च महानगरपालिकेचा झालेला आहे हे अधिकाऱ्याना माहित नव्हते का,न्यायालयाने स्थगिती दिलेल्याची तारीख काय आहे खूलासा करावा.आज हा विषय संपवावा. अशी विनंती आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मा. न्यायालयाचे जैसे से थे आदेश असतील तर बांधकाम करता येत नाही. नवीन पॅनल करावे.चांगल्या व अनुभवी वकीलाची पॅनलवर नियुक्ती करावी.बांधकाम परवानगी दिली असली तरी ते अनधिकृत असेल व बांधकाम झाले असेल तर ते पाडण्यास हरकत नसावी.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : जागेचा मोबदला संबधीत श्री. घोरपडे यांना दिलेला आहे.मोबदला केंव्हा दिला याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री. हिम्मतराव दाभाडे : आताच खूलासा झाला की मा. न्यायालयाने स्थगिती आदेश दिले परंतू त्यापूर्वीपासून मी हा मुद्या उपस्थित करीत होतो. ज्या त्या विभागामध्ये कागदपत्राची हेरफेर झालेली आहे त्या त्या संबधीत अधिकाऱ्यावर सूध्दा कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.अ.साजेद.अ.सत्तार : संबधीत व्यक्तीला जागेचा मोबदला दिलेला असतांना पून्हा त्याांना बाधकाम परवानगी कशी दिली. मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश मिळण्याच्या दृष्टीने प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही केली.

श्री.संजय केनेकर : स. सदस्य या सभागृहात पोटतिडकिने सांगतात की ही महानगरपालिकेची जागा आहे एका व्यक्तीने बळाकावली. तो व्यक्ती न्यायालयात गेले. या सभागृहात किती वेळा बोलले तरी मा. न्यायालयात महापालिकेच्या बाजुने मत मांडणारे तज्ञ वकील आहेत का?सन २००४ मध्ये एका जागेच्या संदर्भात निर्णय लागलेला होता ती जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात नाही. मालमत्तेच्या बाबतीत किती निर्णय महानगरपालिकेच्या बाजूने लागलेले आहे त्याचे मागचे रेकॉर्ड काढावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : बांधकाम परवानगी दिली तेव्हा अधिकारी यांनी स्थळ पाहणी केली असेल तेंव्हा ती जागा महानगरपालिकेची आहे हे अधिकाऱ्याना माहित असेल. तसेच संबधीत व्यक्तीला जागेचा मोबदलाही दिलेला आहे.जागा महानगरपालिकेने घेतलेली असतांना पून्हा त्यांना बांधकाम परवानगी कशी दिली जाते. संबधीत व्यक्ती स्थगिती आदेश आणतात कसे. त्याची तारीख काय आहे याचा खूलासा करावा.

मा. महापौर :हा विषय चार बैठकीपासून सभागृहात चर्चेला येत आहे. तरी सूध्दा काम चालू आहे. प्रशासनास आदेशीत करण्यात येते की जे काम चालू आहे ते त्वरीत बंद करण्यात यावे. पाच पदाधिकारी व प्रशासन यांनी एकत्रीत बसून उदया किंवा एक दोन दिवसात बघून योग्य तो निर्णय घेवू .या बाधंकामास न्यायालयाचे जैसे थे परीस्थिती ठेवण्याचे आदेश असतील तर न्यायालयाचा अवमान कूणी करू नये तेथे काम चालू नसावे असे प्रशासनास आदेशीत करीत आहे. काम होणार नाही याची जबाबदारी प्रशासकीय अधिकारी यांचेवर राहील.

श्री.हिम्मतराव दाभाडे : स्थगिती आदेश हे तारा पान सेंन्टरचे मालक यांनी आणलेला आहे घोरपडे यांनी आणलेला नाही. श्री.माधव घोरपडे यांचे होत असेलेले बांधकाम बंद झाले पाहिजे ते रात्री काम करतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश कूणी आणलेले आहे खूलासा करावा.

श्री.अ.रशीद खान : स्थगिती आदेश कूणी आणलेले आहे .कॅव्हेट दाखल केले होते का. केले नसेल तर का केले नाही.

श्री.प्रशांत देसरडा : संबधीत व्यक्ती जेव्हा न्यायालयात गेले तेंव्हा महानगरपालिकेच्या वतीने पॅनलवरील वकीलानी काय बाजू मांडलेली होती.

मा. महापौर : विधी सल्लागार यांनी सविस्तर खूलासा करावा.

विधी सल्लागार : सदरील प्रकरणी उस्मानपूरा येथील सी.टीएस न. १६९११/१/१/अे क्षेत्रफळ ३९२.७५ चौ.मी.,सर्वे न.६ येथील बांधकामा बाबत श्री.माधव तुळशीराम घोरपडे मा. न्यायालयात दिवाणी दावा क्र ९०४/०६ हा दाखल केलेला आहे. सदरील बांधकामास परवानगी आहे. आणि ही ओपनस्पेसच्या व्यतिरिक्त जागा आहे. मला महापालिकेने परवानगी दिलेली आहे. त्यामूळे महापालिकेस प्रतिबंध करावे यामध्ये हस्तक्षेप करण्यास व बांधकाम पाडण्यास प्रतिबंध करावे अशी विनंती केली. सदरील वाद लक्षात घेवून मा. न्यायालयाने या प्रकरणी दिनांक ४.११.२००६ रोजी महानगरपालिकेस सदरील ठिकाणचे बांधकाम पाडण्यास प्रतिबंध केलेला आहे. सद्य स्थितीत सदरील आदेश हा कायम आहे.

श्री. देसरडा प्रशांत : महापालिकेने न्यायालयात काय बाजू माडली. त्या बाबतीत हरकत आलेली आहे. बांधकाम परवानगी रद्य केली आहे असे मा. न्यायालयात कळविले आहे का.

विधी सल्लागार :ॲडव्होकेट श्री. शिरशीकर म्हणून काम पाहत आहे. सदर ठिकाणी बांधकाम परवानगी दिलेली आहे म्हणून नगररचना विभागाकडून माहिती मागवली परंतू माहिती या विभागास मिळालेली नाही.

श्री.देसरडा प्रशांत : विधी सल्लागार यानी माहिती मागवली एक महिना झाला नगररचना विभागाकडून माहिती दिली जात नाही. त्यामूळे महानगरपालिकेच्या खुल्या जागा हया दुसऱ्या नागरीकांच्या नावावर होवू शकते. हा गोधळ चालत असेल तर खुल्या जागा शिल्लक राहणार नाही. नगररचना विभागातून विधी सल्लागार यांना माहिती का दिलेली नाही. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : अधिकारी एकमेकांना मदत करीत नाही हे योग्य नाही.यात जे ही दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी यामूळे महानगरपालिकेच्या खुल्या जागा शिल्लक राहणार नाही.लोक अतिक्रमण करतील.

श्री.अ.रशिद खान : नोव्हेंबर महिण्यात स्थगिती आदेश आले. चार महिण्यापासून या विषयावर चर्चा होते. संबधीतास न्यायालयात जाण्यास संधी दिली होती काय वेळीच कार्यवाही का केलेली नाही. गांधी पूतळया जवळील जागा महापालिकेची होती बाजूच्या एका

व्यक्तीने एक वर्षापूर्वी स्वत: च्या नावावर करून घेतली.काहीही कार्यवाही झाली नाही त्याप्रमाणे हे प्रकरण आहे.

श्री.शंशांक विसपूते :विधी सल्लागार यांना नगररचना विभागाकडून माहिती मिळालेली नाही. जे अधिकारी दिशाभूल करीत आहेत त्यांना योग्य शिक्षा झालीच पाहिजे.

मा.महापौर : या बाबतीत उपमहापौर,सभापती,स्थायी समिती,सभागृह नेता,विरोधी पक्षनेता व उपआयुक्त एकत्रित बसून या बाबतीत तपासणी करून निर्णय देतील.

सौ. मेहरून्निसा खान : माझ्या वार्डात चार खूल्या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. संबधीत अधिकारी यांना वारंवार पत्र देवूनही कार्यवाही होत नाही.

मा.महापौर : गंभीर बाब आहे. प्रशासनास सूचना देण्यात येते की चार ही ओपनस्पेसवर होत असलेले बांधकाम तीन दिवसाच्या आत बंद व्हावे. तोडले पाहीजे. त्याचा रिपोर्ट पाचही पदाधिकारी यांना देण्यात यावा.

श्री.संजय रिडलॉन : बीओटीवर ज्या अटी शर्ती नुसार लाईटचे काम दिले आतापर्यत संबधीत ठेकेदाराने किती काम केलेले आहे. चार पत्र दिले माहिती मिळालेली नाही. अभिनय टॉकीज ते मोतीकांरजा या रस्त्यावर आजपर्यत लाईटचे काम केले नाही. लाईटचे काम आजपर्यत किती झालेले आहे किती दिवसात होईल.

कार्य.अभियंता(विद्यु) :एकूण पाच हजार दिव्याचे काम दिले आहे. आज रोजी ३७०० दिवे लावण्यात आलेले आहे १३०० पथदिवे लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पंधरा दिवसात पूर्ण काम होईल.

श्री.मो. जावेद मो. इसहाक: पावसाळा संपवून दोन महिणे होत आहे अदयाप रस्त्यावरील पॅचवर्कचे काम झालेले नाही. स.स.श्रीमती नजमा कुरैशी यांनी चार महिण्यापूर्वी पत्र दिले होते काम झाले नाही. चंपा चौक जवळील रस्ता खूप खराब झालेला आहे. पॅचवर्क करण्यात यावे.आजपर्यत तेथील पॅचवर्क का झालेले नाही.

मा. महापौर : किती दिवसात हे काम सूरू करणार आहेत खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : मागिल १५ दिवसापासून शहराच्या प्रत्येक मुख्य रस्त्यावर पॅचवर्कचे काम सुरू आहे. स. सदस्यानी ज्या रस्त्याच्या बाबतीत मूद्या मांडला तेथे ड्रेनेज लाईनचे काम झालेले आहे. मोठे खोदकाम झालेले आहे ते दुरूस्त करावे लागेल प्रथम डब्ल्यु.बी.एम.त्यानंतर पॅचवर्क करता येईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :माझ्या वार्डात किती ओपनस्पेस किती आहे. किती ठिकाणच्या जागे संदर्भात मा. न्यायालयात प्रकरण चालू आहे मी दोन तीन वेळेस अपील केले. अनेकदा पत्रही दिले मला माहिती मिळालेली नाही. तीसरे अपील करावे लागेल.

मा. महापौर : या संदर्भात प्रशासकीय अधिकारी तसेच सहा. संचालक नगररचना यांनी माहिती घेवून सात दिवसाच्या आत पाच पदाधिकारी व स. सदस्य श्री. ठाकूर यांना माहिती दयावी. नसता संबधीत अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.सय्यद खुसरो :अतिक्रमणाच्या बाबतीत सर्वसाधारण सभा स्थायी समितीमध्ये वारंवार चर्चा होते. ज्यांनी अतिक्रमण केले ते हटविले जात नाही माझ्या वार्डातही ओपनस्पेस आहे. सहा महिण्यापासून पत्र देतो परंतू अतिक्रमण हटविले जात नाही.टपऱ्या काढल्या जातात गरीबाचे अतिक्रमण तात्काळ हटविले जाते. मोठमोठया इमारतीचे होत असलेले अतिक्रमण काढले जात नाही.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी या बाबतीत नोंद घेवून सात दिवसाच्या आत कार्यवाही करून सर्व पदाधिकारी यांना कळविण्यात यावे.

श्री.कचरू मोरे : कबीरनगर भागात अनेक लोकांना चिकुनगुनिया झालेला आहे. आरोग्य विभागास मी सुचना केली की एक पथक पाठवावे. परंतू आरोग्य विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

मा. महापौर : या बाबतीत आरोग्य विभागाने काळजी घ्यावी. डास निर्मुलन विशेष मोहिम घेवून कार्यवाही करावी. जास्तच रूग्ण असतील तर तेथे शिबीर घेण्या बाबत कार्यवाही करावी.

श्री.संजय रिडलॉन : वार्ड ड चे खाजगीकरण झाले. ज्या अटी शर्तीनूसार त्यांना ठेका दिला होता त्याचे चेक द्वारे लेबर यांना पगार दिले जाईल. तसेच घरोघरी जावून कचरा उचलला जाईल असे होते. परंतू चांगली साफसफाई होत नाही घरोघरी जावून कचरा उचलला जात नाही. याचा खूलासा घेण्यात यावा.

श्री. वसंत नरवडे : औरंगाबाद शहरात मलेरिया सारख्या रोगाच्या प्रसारास सुरूवात झालेली असून अनेक लोक आजारी पडता आहेत. औषध फवारणीकडे आरोग्य विभागाचे दुर्लक्ष आहे. एक कर्मचारी १० ते १५ घरातील लोकांच्या सहया आणतात व औषध फवारणी केल्याचे दाखवतात.सार्वजनिक ठिकाणी सूध्दा औषध फवारणी होणे गरजेचे आहे. जेथे कचरा उचलला जातो ते पावडर टाकले जात नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दि. १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ पर्यत किती घरांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. तसेच १ एप्रिल २००६ ते सप्टेंबर २००६ पर्यत किती घरांना बांधकाम परवानगी दिलेली आहे.हा मुद्या मागिल बैठकीत मी उपस्थित केला होता. लेखी माहिती देण्याचे मा. महापौर यांनी आदेशीत केलेले होते अदयाप मला माहिती मिळालेली नाही. खूलासा करण्यात यावा.माझ्या माहिती प्रमाणे एक हजार घरांनाच परवानगी दिली. स्पेक या संस्थेने सर्वे केला दोन वर्षात ६० हजार अनधिकृत घरे झालेली आहे. असे दिले.

सहा. संचालक(न.र.) : सन २००५-०६ या वर्षात ६३७ घरांना बांधकाम परवानगी दिली व ९६ प्रकरणांना भोंगवटा प्रमाण पत्र दिले तर १ एलि २००६ ते ३१ ऑक्टो. २००६ पर्यत ४०७ घरांना बांधकाम परवानगी दिली तर ७१ घरांना भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दोन वर्षात १०४४ घरेच बाधंलेली आहे का याचा खूलासा करावा.

मा. महापौर : ऑफिशियल रेकॉर्डवर १०४४ झालेली आहे जे रेकॉर्डवर नाही अशी जी घरे झालेली असतील त्यांची माहिती आपल्याला दिली जाईल.

**विषय क्र. ५८१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,२००६-२००७ च्या अर्थसंकल्पात अनु क्र.३ पान क्र.१७५ वर वार्ड क्र.४१ अंतर्गत डांबरी करण करणे साठी रक्कम ४,०००००/- चार लक्ष ची तरतुद ठेवण्यात आली होती परंतु शाहबाज येथे अंतर्गत गल्यामध्ये ड्रेनेज चे फुटकर काम विविध ठिकाणासाठी बदलुन देण्यात यावी. या करीता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर ही नम्र विनंती.

सुचक : सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस अनुमोदक : श्री.नासेर.मो.नाहदी

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात अनु क्र.३ पान क्र.१७५ वर वार्ड क्र.४१ अंतर्गत डांबरीकरण करणे साठी ठेवण्यात आलेली र.रू.४,०००००/- चार लक्ष तरतूद **याऐवजी** शाहबाज येथे अंतर्गत गल्यामध्ये ड्रेनेजचे फुटकळ काम करणेसाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ मध्ये जी.आय.पोल ची फार आवश्यकता आहे.व लाईट फिटींगची सुध्दा आवश्यकता आहे. तो वार्ड क मधुन पान क्र.डब्ल्यु-१०८ मध्ये १२ लक्ष व ८ लक्ष बजट आहे. कृपा करून मला वार्ड करीता ५.०० लक्ष द्यावे ही विनंती.

सुचक : सौ.खान मेहेरून्नीसा हमीद खान अनुमोदक :श्रीमती नजमा युनूस कुरैशी

मा. महापौर : सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने स्थगित ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ५८३/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१२८ मध्ये २.०० लक्ष रू. विविध ठिकाणी गटर दुरूस्ती साठी आहे.ते हेड बदलुन २.०० लक्ष पेव्हर ब्लॉक करीता द्यावे ही विनंती.

सुचक :सौ.खान मेहेरून्नीसा हमीद खान अनुमोदक :श्रीमती नजमा युनूस कुरैशी

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ साठी पान क्र.डब्ल्यु-१२८ वर असलेली तरतूद र.रू.२.०० लक्ष **याऐवजी** र.रू.२.०० लक्ष पेव्हर ब्लॉक बसविणे करीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४१ शहाबाजार येथे लाईट फिटींग करीता ५.०० लक्ष रू. वार्ड क चे बजट २००६-२००७ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१०८ मध्ये १२ लक्ष व ८ लक्ष आहे ते हेड बदलुन देणे ही विनंती.

सुचक : श्रीमती नजमा युनूस कुरैशी अनुमोदक :श्री.मिलींद दाभाडे

मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने स्थगित करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ५८५/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००६-२००७ मधील प्रस्तावित खालील काम

१) पेज क्र.डब्ल्यु-७६, अ.क्र.६ वार्ड क्र.५१ मधील विविध भागातील जलवाहिनी बदलणे र.रू.५ लाख हे काम रद्द करून त्या ऐवजी खालील कामे करणे चा प्रस्ताव मान्य करावा.

१) वार्ड क्र.५१ मधील ड्रेनेज लाईन अप्ग्रुटींग करणे. रू.२.५० लाख.

२) वार्ड क्र.५१ मधील एच.आर.जी. ची दुरूस्ती करणे. रू.२.५० लाख.

उपरोक्त कामाचे लेखाशिर्षात बदल करून प्रस्तावास मान्यता व्हावी.

सुचक : श्री.कैलास गायकवाड अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल

मा.महापौर : विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५१ करीता सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित पान क्र.डब्ल्यु-७६, अ.क्र.६ मध्ये विविध भागातील जलवाहिनी बदलणे र.रू.५.०० लाख **याऐवजी** खालील कामे करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. वार्ड क्र.५१ मधील ड्रेनेज लाईन अप्ग्रुटींग करणे. रू.२.५० लाख.

०२. वार्ड क्र.५१ मधील एच.आर.जी. ची दुरूस्ती करणे. रू.२.५० लाख.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

मा.महापौर : पुरवणीचे विषय क्र १ ते ४ मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८६/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील विशेष समित्यांचे सभापती यांना शहरातील नागरीकांच्या विविध समस्यांचे निवारण करणे. यासाठी विविध भागात भेट देणेकरीता सभापती यांना शहरात फिरावे लागते. करीता त्यांना वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. तरी विशेष समित्यांचे सभापती यांना महानगरपालिकेचे वाहन देण्यात यावे,करीता प्रस्ताव मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

सुचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक : श्री.प्रकाश अत्तरदे,श्री.सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतील विशेष समित्यांचे सभापती यांना महानगरपालिकेचे वाहन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागाकरीता अर्थसंकल्प पुस्तिका २००६-०७.

| अ.क्र. | कामे | या कामा ऐवजी |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.२९ मजनूहील येथे पाण्याची टाकी तयार करणे. पान क्र.डब्ल्यु-१८३ र.रू.५.०० लाख आहे. | १) वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी अंतर्गत गणेश कॉलनी येथे जुनी जलवाहिनी बदलणे. र.रू.२.५ लाख.<br>२) वार्ड क्र.२९ अंतर्गत आलमगीर कॉलनी येथे जुनी जलवाहिनी बदलणे र.रू.२.५ लाख. |

सुचक : श्री.मो.जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागाकरीता अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कामे | या कामा ऐवजी |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.२९ मजनूहील येथे पाण्याची टाकी तयार करणे. पान क्र.डब्ल्यु-१८३ र.रू.५.०० लाख आहे. | १) वार्ड क्र.२९ गणेश कॉलनी अंतर्गत गणेश कॉलनी येथे जुनी जलवाहिनी बदलणे. र.रू.२.५ लाख.<br>२) वार्ड क्र.२९ अंतर्गत आलमगीर कॉलनी येथे जुनी जलवाहिनी बदलणे र.रू.२.५ लाख. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागातील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेसाठी अर्थसंकल्प पुस्तिकात पान क्र.१५० अनु क्र.१७ वर आहे.

**या कामाऐवजी**

१) प्रभाग क्र.२९ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे वार्ड कार्यालय ''क'' जाफर गेट कडे वळती-६.०० लाख.

२) वार्ड क्र.२९ मध्ये फरशी दुरूस्ती, खडी रस्ते, पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनिसारण कामे व इतर आवश्यकतेनुसार फुटकळ कामे. वार्ड कार्यालय ''क'' जाफर गेट कडे वळती-४.०० लाख.

सुचक : श्री.मो.जावेद कुरैशी अनुमोदक : श्रीमती मसरत बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागातील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेसाठी अर्थसंकल्पात पान क्र.१५० अनु क्र.१७ वर असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) प्रभाग क्र.२९ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे वार्ड कार्यालय ''क'' जाफर गेट कडे वळती- र.रू.६.०० लाख.

२) वार्ड क्र.२९ मध्ये फरशी दुरूस्ती, खडी रस्ते, पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनिसारण कामे व इतर आवश्यकतेनुसार फुटकळ कामे. वार्ड कार्यालय ''क'' जाफर गेट कडे वळती-र.रू.४.०० लाख.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ०१. बन्सीलालनगर भागातील बॅडमिंटन हॉलची दुरूस्तीची कामे करणे -१.०० लक्ष ऐवजी १.गोळेगांवकर कॉलनी मध्ये विद्युत पथदिवे व्यवस्था करणे.-१.०० लक्ष.
०२. बन्सीलालनगर बॅडमिंटन हॉलचे विद्युतीकरण करणे रूपये १.०० लक्ष ऐवजी वॉर्ड ९४ अंतर्गत विवेकानंद कॉलनी येथे विद्युत पथदिव्यांची व्यवस्था करणे. १.०० लक्ष अशी तरतूद वळती करण्यांत यावी.

सुचक : सौ.अल्पा विकास जैन अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ०१. बन्सीलालनगर भागातील बॅडमिंटन हॉलची दुरूस्तीची कामे करणे र.रू.१.०० लक्ष **याऐवजी** १.गोळेगांवकर कॉलनी मध्ये विद्युत पथदिवे व्यवस्था करणे. र.रू.१.०० लक्ष.
०२. बन्सीलालनगर बॅडमिंटन हॉलचे विद्युतीकरण करणे र.रू.१.०० लक्ष **याऐवजी** वॉर्ड ९४ अंतर्गत विवेकानंद कॉलनी येथे विद्युत पथदिव्यांची व्यवस्था करणे. र.रू.१.०० लक्ष अशी तरतूद वळती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

मा.महापौर : ऐनवेळचे विषय आहेत सचिव वाचून दाखवतील.

**विषय क्र. ५९० :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.९५ पदमपुरा येथे उद्यान विकसीत करणे करीता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये २,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार सदरील कामाचे रितसर निविदा कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदरील काम प्रगतीपथावर असुन सदरील कामास्तव स्पील ओव्हर अंतर्गत रक्कम रू.१,००,०००/- ची तरतुद उपलब्ध आहे. उर्वरीत रक्कम रू.१,००,०००/- हे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखा शिर्षा अंतर्गत पान क्र.डब्ल्यु-४७ अ.क्र.८ वरील वेदांतनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामातील बचत रक्कम रू.१.०८ लक्ष मधून करण्यात येईल.

त्यानुसार पदमपुरा येथे उद्यान विकसीत करणे या कामासाठी विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखा शिर्षा अंतर्गत पान क्र.डब्ल्यु-४७ अ.क्र.८ वरील वेदांतनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामातील बचत रक्कम रू.१.०८ लक्ष वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९५ पदमपुरा येथे उद्यान विकसीत करणेच्या कामाकरीता, विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखा शिर्षा अंतर्गत पान क्र.डब्ल्यु-४७ अ.क्र.८ वरील वेदांतनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामातील बचत रक्कम रू.१.०८ लक्ष वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१ :**

आयुक्त,महानगरपालिका यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे संत एकनाथ रंग मंदीर या नाट्यगृहाचे नुतणीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. नुतणीकरणाची विविध कामे प्रगतीपथावर आहेत. या नाट्यगृहामध्ये पूर्वीचीच आसन व्यवस्था आहे. याबाबत नाट्यकर्मी व या क्षेत्रातील जाणकारांनी खुर्च्या नव्याने बसवून आसन व्यवस्थाही सुधारीत करण्याबाबत सूचना केली. ज्यामूळे भविष्यामध्ये आसन व्यवस्था बदलण्यासाठी पुन्हा नाट्यगृह बंद ठेवावे लागणार नाही.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२२.२५ लक्षचे तयार करण्यात आले आहे, त्यास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.३२४ दिनांक ११.०८.२००६ रोजी मान्यता दिलेली आहे, तथापी आसन व्यवस्था ही चांगल्या दर्जाच्या अद्यावत करणेस्तव सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.२४,९९,५२५/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी २५.०० लक्षची तरतूद उपलब्ध आहे.

त्यानुसार उपरोक्त कामांचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.२४,९९,५२५/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. देसरडा प्रशांत : टेंडर काढून कार्यवाही करावी.

मा. महापौर : ठिक आहे टेंडर काढून कार्यवाही करावी मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचे संत एकनाथ रंग मंदीर या नाट्यगृहाचे आसन व्यवस्था ही चांगल्या दर्जाच्या अद्यावत करणेच्या सुधारीत रक्कम रू.२४,९९,५२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९२ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा येथे स्टॉर्म वॉटर गटार बांधणेच्या कामासाठी सन २००५-२००६ चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे जिल्हा दर सूचीनुसार खर्च रू.३,७८,२४७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम हे

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | वॉर्ड इ क्षेत्रातील स्लम देखभाल दुरूस्ती | - | २,७८,२४७.०० |
| ०२. | स्लम भागातील खूल्या गटारी मधून | - | १,००,०००.०० |
| | | **एकूण** | **३,७८,२४७.००** |

अशा दोन विविध लेखाशिर्षामधून घेण्यात आले आहे. दोन वेगवेगळ्या लेखा शिर्षामधून तरतूद वळती करण्यासाठी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १०३ अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक असल्याने प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय क्र.३ व ४ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा येथे स्टॉर्म वॉटर गटार बांधणेच्या र.रू.३,७८,२४७/- चे अंदाजपत्रकास तसेच प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ व २ या लेखाशिर्षातून सदर तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको प्रशासनाने वृत्तपत्रात जाहीरात देवून सामाजिक सुविधांसाठी आरक्षित असलेले भूखंड विक्रीस काढले आहे. महानगरपालिकेकडे नुकतेच सिडकोचे हस्तांतरण झाले असुन सिडको परिसरातील नागरीकांच्या सोयीसाठी सामाजिक सुविधांसाठी आरक्षित असलेली सर्व भूखंड महानगरपालिकेस जी भूखंड (आरक्षणे) आवश्यक वाटतात अशी सर्व आरक्षीत भूखंड सामाजिक सुविधांसाठी इतरांना न विकता नाममात्र दरावर कायमस्वरूपी महानगरपालिकेस देण्यात यावेत

व त्या प्रमाणे प्रस्ताव महानगरपालिकेतर्फे सिडको प्रशासन व महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात यावा.करीता प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.अनिल जैस्वाल, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्री.रेणुकादास वैद्य, श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको प्रशासनाने वृत्तपत्रात जाहीरात देवून सामाजिक सुविधांसाठी आरक्षित विक्रीस काढलेले भूखंड सिडको परिसरातील नागरीकांच्या सोयीसाठी सामाजिक सुविधांसाठी आरक्षित असलेली सर्व भूखंड महानगरपालिकेस जी भूखंड (आरक्षणे) आवश्यक वाटतात, अशी सर्व आरक्षीत भूखंड सामाजिक सुविधांसाठी इतरांना न विकता नाममात्र दरावर कायमस्वरूपी महानगरपालिकेस देण्यात यावेत व त्याप्रमाणे प्रस्ताव महानगरपालिकेतर्फे सिडको प्रशासन व महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.डब्ल्यू १५२ वरील लेखाशिर्ष नवीन खडी रस्ते व कव्हर्ट मधील अ.क्र.७ ची वार्ड क्र.३७ मधील नाथ मंदिर ते सरस्वती भुवन रस्त्यावरील जुना पुल रूंद करणे या कामासाठी ठेवण्यात आलेली तरतुद १०.०० लाख ही वार्ड क्र.३७ मधील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हीग ब्लॉक बसविणे या कामासाठी वळती करून घ्यावी ही विनंती.

सुचक : श्री.वसंत नरवडे पाटील    अनुमोदक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.डब्ल्यू १५२ वरील लेखाशिर्ष नवीन खडी रस्ते व कव्हर्ट मधील अ.क्र.७ ची वार्ड क्र.३७ मधील नाथ मंदिर ते सरस्वती भुवन रस्त्यावरील जुना पुल रूंद करणे या कामासाठी ठेवण्यात आलेली तरतुद र.रू.१०.०० लाख ही वार्ड क्र.३७ मधील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हीग ब्लॉक बसविणे या कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८० अंबिकानगर-मुकूंदवाडी हा वार्ड अनुसूचित जाती साठी राखीव असल्यामुळे व खूपच मागासलेला आहे. त्यामुळे ह्या प्रभागास स्लम घोषित करण्यात यावी अशी नागरिकांची मागणी आहे.

करिता प्रभाग क्रमांक-८० अंबिकानगर-मुकूंदवाडी या भागास स्लम एरिया म्हणून घोषित करण्यात यावा व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नारायण कुचे, श्री.भगवान घडमोडे, श्री.भाऊसाहेब ताठे

अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन, श्री.सिताराम सुरे

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८० अंबिकानगर-मुकूंदवाडी या भागास स्लम एरिया म्हणून घोषित करण्यास व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१७५ अ.क्र.२ वार्ड क्र.२७ येथे खडी रस्ते तयार करणे र.रू.२००००० तरतुद असुन सदरील कामा ऐवजी वार्ड क्र.२७ येथे विविध ठिकाणी कॉंक्रेटींग व पेव्हर ब्लॉक करण्यात यावे.

सुचक : श्रीमती अजरा जबीन मसुद खान

अनुमोदक : श्री.किशोर तुलसीबागवाले, श्रीमती मेहरून्नीसा बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१७५ अ.क्र.२ वार्ड क्र.२७ येथे खडी रस्ते तयार करणे र.रू.२.०० लक्ष असलेली तरतुद वार्ड क्र.२७ येथे विविध ठिकाणी काँक्रेटींग व पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील कामाची वळती करण्यात यावी.

**(रूपये लक्षात) (रूपये लक्षात)**

| अ. क्र. | पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | रूपये | अ. क्र. | प्रस्तावित कामाचे नांव | रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५६ | २२ | गाथा को.हॉ.सो. पहाडसिंगपुरा येथील खुली जागा विकसित करणे. | २.५० | १ | वार्ड क्र.५ दिलरस कॉलनी येथे मनपाची खुली जागा विकसित करणे. | २.५० |
| २ | ७९ | ८ | प्रभाग क्र.५ खान नदी स्मशान भुमीतील विविध कामे करणे. | ०.५० | २ | दोन ए-१ चे किरकोळ कामे करणे. | ०.५० |
| ३ | ८२ | ३ | विद्याविहार येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २.०० | ३ | पहाडसिंग येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | २.०० |
| ४ | ८४ | १५ | असिफीया कॉलनी येथे जुनी आर.सी.सी लाईन काढून नवीन एस.डब्ल्यु ची लाईन टाकणे. | १.०० | ४ | ए-१ व रेट लिस्ट चे फुटकळ कामे करणे. | १.०० |
| ५ | ८८ | १ | असिफिया कॉलनी बिसमिल्ला कॉलनी येथील जुनी आर.सी.सी लाईन काढून नवीन एस.डब्ल्यु ची लाईन टाकणे. | १.०० | ५ | पहाडसिंग पुरा येथे सोडीयम फिटींग बसविणे. | १.०० |
| ६ | १५२ | २ | वार्ड क्र.५ मध्ये खुशबू सोसायटी येथे खडीकरण व मजबुतीकरण करणे. | ५.०० | ६ | दोन ए-१ चे किरकोळ कामे करणे. | ०.५० |
| ७ | १६० | १ | खाम नदीत आरेफ कॉलनी ते मकाई गेट पर्यंत नाला संरक्षीत भिंत बांधणे. | १०.०० | ७ | सांस्कृतिक सभागृह बांधणे.<br>नवीन जी.आय.पोल सोडीयम फिटींग लावणे. | ७.५०<br>२.५० |

सुचक :श्री.नासेर मो.नाहदी अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालीलप्रमाणे कामाची वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

(रूपये लक्षात) (रूपये लक्षात)

| अ. क्र. | पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | रूपये | अ.क्र. | प्रस्तावित कामाचे नांव | रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५६ | २२ | गाथा को.हॉ.सो. पहाडसिंगपुरा येथील खुली जागा विकसित करणे. | २.५० | १ | वार्ड क्र.५ दिलरस कॉलनी येथे मनपाची खुली जागा विकसित करणे. | २.५० |
| २ | ७९ | ८ | प्रभाग क्र.५ खान नदी स्मशान भुमीतील विविध कामे करणे. | ०.५० | २ | दोन ए-१ चे किरकोळ कामे करणे. | ०.५० |
| ३ | ८२ | ३ | विद्याविहार येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २.०० | ३ | पहाडसिंग येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | २.०० |
| ४ | ८४ | १५ | असिफीया कॉलनी येथे जुनी आर.सी.सी लाईन काढून नवीन एस.डब्ल्यु ची लाईन टाकणे. | १.०० | ४ | ए-१ व रेट लिस्ट चे फुटकळ कामे करणे. | १.०० |
| ५ | ८८ | १ | असिफिया कॉलनी बिसमिल्ला कॉलनी येथील जुनी आर.सी.सी लाईन काढून नवीन एस.डब्ल्यु ची लाईन टाकणे. | १.०० | ५ | पहाडसिंग पुरा येथे सोडीयम फिटींग बसविणे. | १.०० |
| ६ | १५२ | २ | वार्ड क्र.५ मध्ये खुशबू सोसायटी येथे खडीकरण व मजबुतीकरण करणे. | ५.०० | ६ | दोन ए-१ चे किरकोळ कामे करणे. | ०.५० |
| ७ | १६० | १ | खाम नदीत आरेफ कॉलनी ते मकाई गेट पर्यंत नाला संरक्षीत भिंत बांधणे. | १०.०० | ७ | सांस्कृतिक सभागृह बांधणे.<br>नवीन जी.आय. पोल सोडीयम फिटींग लावणे. | ७.५०<br>२.५० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५९८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील नमुद कामाची वळती करण्यात यावी.

(रूपये लक्षात) (रूपये लक्षात)

| अ. क्र. | पान क्र. | अ. क्र. | कामाचे नाव | रूपये | अ. क्र. | प्रस्तावित कामाचे नाव | रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६१ | १ | वार्ड क्र.५ मधील निपट निरंजन सोसायटीच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | ५.०० | १० | वार्ड क्र.५ गौतम नगर, घाटी स्लम भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५.०० |
| २ | १६२ | १ | मकबऱ्याचे पाठीमागे धोबी कब्रस्तान येथे संरक्षित भिंत बांधणे. | ४.०० | ८ | वार्ड क्र.५ येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ४.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १६४ | १ | पहाडसिंग पुरा पवन नगर भागात नवीन जलवाहिनी टाकणे. | २.०० | ९ | वार्ड क्र.५ येथे विविध ठिकाणी बोरींग करणे. | २.०० |
| ४ | १८३ | | वार्ड क्र.५ प्रगती कॉलनी येथे मुतारी बांधणे (सुलभ शौचालय) | २.०० | ११ | वार्ड क्र.५ येथे विविध ठिकाणी आर.सी.सी बेंचेस फसविणे. | २.०० |

सुचक : श्री.नासेर मो.नाहदी अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालीलप्रमाणे नमुद कामाची वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(रूपये लक्षात)** **(रूपये लक्षात)**

| अ. क्र. | पान क्र. | अ. क्र. | कामाचे नाव | रूपये | अ. क्र. | प्रस्तावित कामाचे नाव | रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६१ | १ | वार्ड क्र.५ मधील निपट निरंजन सोसायटीच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | ५.०० | १० | वार्ड क्र.५ गौतम नगर, घाटी स्लम भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५.०० |
| २ | १६२ | १ | मकबऱ्याचे पाठीमागे धोबी कब्रस्तान येथे संरक्षित भिंत बांधणे. | ४.०० | ८ | वार्ड क्र.५ येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ४.०० |
| ३ | १६४ | १ | पहाडसिंग पुरा पवन नगर भागात नवीन जलवाहिनी टाकणे. | २.०० | ९ | वार्ड क्र.५ येथे विविध ठिकाणी बोरींग करणे. | २.०० |
| ४ | १८३ | | वार्ड क्र.५ प्रगती कॉलनी येथे मुतारी बांधणे (सुलभ शौचालय) | २.०० | ११ | वार्ड क्र.५ येथे विविध ठिकाणी आर.सी.सी बेंचेस फसविणे. | २.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७६ मधील अतिक्रमण काढलेल्या जागेवर संरक्षित भिंत त्वरीत बांधणे आवश्यक असल्याने तसेच मनपाच्या विविध खूल्या जागेतील, ड्रेनेज व अंतर्गत रस्त्यावरील किरकोळ स्वरूपाची कामे करणे आवश्यक असल्याने सदरील कामांकरीता वॉर्ड कार्यालय-इ कडे तरतूद उपलब्ध नसल्याने कामे प्रलंबित राहत असून तसेच अतिक्रमण काढलेल्या जागेवर पुन:श्च अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. करीता सदरील काम त्वरीत करणेसाठी अर्थसंकल्प सन २००६-०७ मधील पान क्र.एम-४९ अ.क्र.१ अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी करणे या लेखाशिर्षकाअंतर्गत उपलब्ध रक्कम रू.२.०० कोटीच्या तरतूदीमधून संरक्षित भिंतीकरीता रू.३.०० लक्ष तसेच किरकोळ स्वरूपांच्या कामाकरीता रू.३.०० लक्षची तरतूद वळती करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : सौ.लता दलाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७६ मधील अतिक्रमण काढलेल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे, मनपाच्या विविध खूल्या जागेतील, ड्रेनेज व अंतर्गत रस्त्यावरील किरकोळ स्वरूपाची कामे करणे करीता अर्थसंकल्प सन २००६-०७ मधील पान क्र.एम-४९ अ.क्र.१ अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी करणे या लेखाशिर्षकाअंतर्गत उपलब्ध रक्कम रू.२.०० कोटीच्या तरतूदीमधून संरक्षित भिंतीकरीता र.रू.३.०० लक्ष तसेच किरकोळ स्वरूपांच्या कामाकरीता र.रू.३.०० लक्षची तरतूद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५४ संजयनगर या प्रभागाकरीता अर्थसंकल्प २००६-०७ पान क्र.डब्ल्यु-१८१ प्र.क्र.५४ अंतर्गत कैलासनगर स्मशानभूमीचे दुरूस्तीचे काम करणे रू.३.५ लक्ष (साडेतीन लक्ष)

या कामाऐवजी

प्रभाग क्र.५४ संजयनगर येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉँक्रीट रस्ते तयार करणे रू.३.५० लक्ष.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५४ संजयनगर या प्रभागाकरीता अर्थसंकल्प २००६-०७ पान क्र.डब्ल्यु-१८१ वरील तरतूद र.रू.३.५० लक्ष **या कामाऐवजी** प्रभाग क्र.५४ संजयनगर येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉँक्रीट रस्ते तयार करणे र.रू.३.५० लक्ष. असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.१ हर्सूल येथे विविध ठिकाणी जूनी आर.सी.सी. लाईन काढून नविन एस.डब्ल्यु.जी.लाईन टाकणेचे काम करणे करीता खालील लेखाशिर्षक

०१. पाणी पुरवठा व जलनि:सारण कामे (स्लम) पा.क्र.डब्ल्यु.७९ अ.क्र.१ तरतूद ०.५० लक्ष

०२. भांडवली कामे जलनि:सारण पा.क्र.डब्ल्यु८२ अ.क्र.६ तरतूद १.५० लक्ष

वरील दोन लेखाशिर्षकांचे एकत्रीकरण करून वरील काम करण्याची परवानगी द्यावी.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.१ ते २ **ऐवजी** प्रभाग क्र.१ हर्सूल येथे विविध ठिकाणी जूनी आर.सी.सी. लाईन काढून नविन एस.डब्ल्यु.जी.लाईन टाकणेचे काम करणे करीता लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.१ हर्सूल पूर्व भागाचे जूने कॉँक्रीट रस्ते दुरूस्त करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे काम करणेकरीता खालील तीन लेखाशिर्षक एकत्रीकरण करून कामास मंजूरी द्यावी.

०१. नविन कॉँक्रीट रस्ते पा.क्र.डब्ल्यु ७८ अ.क्र.२ व ३ तरतूद १.०० लक्ष

०२. इतर कल्याणकारी योजना (स्लम) पा.क्र.डब्ल्यु ७९ अ.क्र.७ तरतूद ०.५० लक्ष

०३. स्लम देखभाल व दुरूस्ती पा.क्र.डब्ल्यु ८४ अ.क्र.१० तरतूद ०.५० लक्ष

वरील तिनही लेखाशिर्षकांचे एकत्रीकरण करून उपरोक्त काम करण्याची परवानगी मिळावी.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.१ ते ३ **ऐवजी** प्रभाग क्र.१ हर्सूल पूर्व भागाचे जूने कॉँक्रीट रस्ते दुरूस्त करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामाकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.६ बेगमपुरा अंतर्गत छोट्या गल्ल्यामध्ये व मनपाच्या खूल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे कामासाठी खालील दोन लेखाशिर्षक एकत्रीकरण करणे बाबत मंजुरी द्यावी.

०१. कॉँक्रीट रस्ते (शहरी भाग) पा.क्र.डब्ल्यु.८१ अ.क्र.२४ तरतूद २.०० लक्ष

०२. बागा देखभाल व दुरूस्ती पा.क्र.डब्ल्यु.८३ अ.क्र.१ तरतूद २.०० लक्ष

सुचक : श्री.विनायक प्रभाकर पांडे अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.१ ते २ **ऐवजी** प्रभाग क्र.६ बेगमपुरा अंतर्गत छोट्या गल्ल्यामध्ये व मनपाच्या खूल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामासाठी लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.१० अंतर्गत विविध ठिकाणच्या गटारीची दुरूस्ती करणे व ढापे टाकणे कामाकरीता खालील दोन लेखाशिर्षक एकत्रीकरण करून काम करण्याची परवानगी द्यावी.

०१. खूल्या गटारी संरक्षित भिंत (स्लम) पा.क्र.डब्ल्यु ७९ अ.क्र.२ तरतूद ०.७५ लक्ष

०२. जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती पा.क्र.डब्ल्यु.९१ अ.क्र.४० तरतूद २.५० लक्ष

वरील दोन लेखाशिर्षक एकत्रीकरण करून विषयांकित कामास तरतूद वापरण्याची परवानगी द्यावी.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.